मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवड रेल्वे मार्गावर उभारला जाणार नवीन पूल!

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी व सर्वसाधारण सभेत दिली मंजूरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथे मुंबई-पुणे महामार्ग ते प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गादरम्यान असलेल्या लोहमार्गावर नवीन पूल उभारण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी (३ डिसेंबर २०२४) झालेल्या स्थायी व सर्वसाधारण सभेत मंजुरी दिली आहे.



पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या स्थायी समितीची सभा झाली. या सभेमध्ये स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. या विषयांना प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली आहे. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

चिंचवड येथील रेल्वेवरील वाहतुकीसाठी दोन समांतर रेल्वे उड्डाणपूल अस्तित्वात आहेत. त्यापैकी चिंचवड स्टेशनवरुन चिंचवड गावाकडे जाताना उजव्या बाजुकडील पूल नवीन आहे. तसेच, डाव्या बाजुकडील पूल हा जुना आहे. जुन्या पुलाचे आयुर्मान संपत आले असल्याने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने या पुलाची पाहणी करण्यात आली होती. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट तज्ज्ञ संस्थेकडून करून घेण्यात आले होते. या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल महानगरपालिकेने आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरींग यांच्यामार्फत त्रयस्थपणे छाननी करून घेतला होता. त्यातच भारतीय रेल्वे विभागाने देखील पिंपरी चिंचवड महापालिकेला संबंधित पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी करणेबाबत पत्र पाठवले होते.

दरम्यानच्या काळात पुलाच्या केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटचे सादरीकरण महानगरपालिका आयुक्त यांच्यासमोर करण्यात आले. त्यानंतर आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार स्ट्रक्चरल ऑडिट अहवालाबाबत निष्कर्ष काढणे, आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेचे शहर अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीची बैठकीत स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल व रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार काही उपाययोजना सूचवल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिकेने पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी केला.

### पाच ते दहा वर्ष वाढले पुलाचे आयुष्य

» पिंपरी येथील उड्डाणपुलाचे रेल्वेच्या सल्ल्यानुसार स्ट्रक्चरल ऑडिट करून मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. हे काम झाल्यामुळे पुलाचे आयुर्मान देखील ५ ते १० वर्षांनी वाढले आहे. आता या पुलाबाबत भविष्यात पाच वर्षानंतर स्ट्रक्चरल ऑडिट करून रेल्वे विभागाच्या सल्ल्याने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी येथील पूल पाडण्याची सूचना किंवा लेखी पत्र रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेले नाही.

---

# महानगरपालिका-भारतीय हवामान विज्ञान विभाग पुणे यांच्यात करार!

## हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम उपाययोजना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराचे बदलते हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम, आपत्ती व्यवस्थापन करताना राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग (IMD) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे.



निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे हवामान बदलाचे संकेत देणारा अत्याधुनिक एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार आहे. याठिकाणी निश्चित केलेल्या जागेची पाहणी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पुणे येथील भारतीय हवामान विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ के.एस. होसाळीकर यांनी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उद्यान अधीक्षक योगेश वाळूंज तसेच भारतीय हवामान विज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ उदय शेंडे, डॉ. शिजो झकारिया, अश्विन राजू डी.के आदी उपस्थित होते. रडार प्रणाली उभारण्यासाठी महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हवामान विभागामार्फत त्या ठिकाणी रडार उभारण्यात येणार आहे.

जागतिक स्तरावरील हवामान झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. बदलते हवामान आणि त्यामुळे उद्भवणारी आपत्ती यावर संरचनात्मक उपाय योजना करण्यासाठी तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी हवामान व वातावरणीय बदलाच्या माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी दोन्ही संस्थामध्ये झालेला सामंजस्य करार भविष्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले. या करारानुसार भारतीय हवामान खाते पिंपरी चिंचवड महापालिकेला वेळोवेळी शहरातील हवामानाचे अंदाज तसेच त्याबाबत करावयाच्या उपाय योजना याबाबत सूचना देणारी माहिती पुरवणार आहे. या माहितीच उपयोग महापालिकेला विविध उपाय योजना आणि नियोजन करण्यासाठी होणार असल्याचे आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

# अजित पवारांचा उपमुख्यमंत्रीपदी 'षटकार'

## राज्यात सर्वाधिक सहाव्यांदा उपमुख्यमंत्री शपथ घेतलेले पहिले नेते ठरले

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आजपासून पुन्हा एकदा देवेंद्र पर्व सुरु झाले. मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित केलेल्या सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि.५) तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ते आता राज्याचे २१ वे मुख्यमंत्री बनले आहेत. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडला. विशेष म्हणजे ६५ वर्षीय अजित पवार यांनी आज सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यामुळे राज्यात सर्वाधिक सहावेळा उपमुख्यमंत्री झालेले ते पहिले नेते ठरले आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील आझाद मैदानावर शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, उत्तर प्रदेशचे योगी आदित्यनाथ, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, भारतरत्न सचिन तेंडुलकर, उद्योगपती मुकेश अंबानी, अनिल अंबानी, अनंत अंबानी, अभिनेता शाहरुख खान, अभिनेता सलमान खान, अभिनेता रणबीर कपूर,अभिनेता रणवीर सिंग, अभिनेता रितेश देशमुख, अभिनेत्री माधुरी दीक्षित, अभिनेत्री विद्या बालन यांची प्रमुख उपस्थिती होती.

**आठव्यांदा बारामतीतून प्रतिनिधीत्व**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बारामतीकरांनी सलग आठव्यांदा साथ दिली. विधानसभा निवडणुकीत एक लाखाहून अधिक मताधिक्याने अजित पवार यांनी आपला गड राखला. पुतणे युगेंद्र यांच्यावर त्यांनी मोठी मात केली.

### अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्री

» अजित पवार पहिल्यांदा १९९१ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. अजित पवार बारामती मतदारसंघाचे १९९१ पासून प्रतिनिधित्व करीत आहेत. सलग आठ वेळा ते बारामतीतून निवडून गेले आहेत. अजित पवार नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१२, ऑक्टोबर २०१२ ते सप्टेंबर २०१४, २३ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०१९ (पहाटेचा शपथविधी), डिसेंबर २०१९ ते जून २०२२, जुलै २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या काळात अजित पवार उपमुख्यमंत्रीपदी राहिले. आज गुरुवार ५ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली.

# अत्यावश्यक विकासकामांचे प्रस्ताव तत्काळ सादर करा

## महानगरपालिका स्थायी समितीची मंजुरी : आमदार लांडगे, माजी नगरसेवक भालेकर यांचा पाठपुरावा

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे गेल्या आठ महिन्यात महापालिकेची विकासकामे ठप्प झाल्याने आता आगामी काळात अत्यावश्यक विकासकामे पूर्ण करण्यासाठी प्रशासन सरसावले आहे. पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, विद्युत, घनकचरा, क्षेत्रीय कार्यालयांकडील महत्वाच्या कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश आयुक्त डॉ. राजेश भोसले यांनी खातेप्रमुखांना दिले आहेत.



पुणे महापालिकेचा 2024-25 चा अर्थसंकल्प 11 हजार कोटींचा आहे. त्यानुसार एप्रिल 2024 ते 30 सप्टेंबर 2024 या सहा महिन्यांच्या कालावधीत महापालिकेला मिळकतकर, बांधकाम शुल्क, एलबीटी, जीएसटीचा परतावा यांसह अन्य ठिकाणांवरून 4 हजार 309 कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्यापैकी 2 हजार 958 कोटींचा खर्च झाला आहे.

यामध्ये विकासकामांवरील भांडवली खर्च 675 कोटी इतका आहे, तर तब्बल 700 कोटी रुपये बँकेत मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवले आहेत. महसुली खर्चामध्ये प्रामुख्याने वेतनावर 1 हजार 498 कोटी, वीजबिल 175 कोटी, कर्जावरील व्याज 8 कोटी, अन्य खर्च 467 कोटी इतका झाला आहे.

यामध्ये विकासकामांपेक्षा महापालिकेचे कर्मचारी, अधिकारी यांच्या पगारावर 1 हजार 498 कोटी रुपये खर्च झाले आहेत. भांडवली कामासाठी केवळ 675 कोटी रुपये खर्च झाल्याचे समोर आले आहे. ही आकडेवारी समोर आल्यानंतर आता महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे. आयुक्त डॉ. भोसले यांनी बुधवारी यासंबंधीचा आढावा घेतला. आगामी महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेत विकासकामे अडकू नयेत यासाठी नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाची आणि आवश्यक असलेल्या विकासकामांचे तातडीने प्रस्ताव सादर करा, असे आदेश त्यांनी खातेप्रमुखांना दिले आहेत.

### विभागप्रमुखांची उदासीनता

» लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता महापालिका आयुक्तांकडून शहरातील सुमारे 1200 कोटींच्या भांडवली कामांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात आत्तापर्यंत त्यातील 500 ते 600 कोटींच्या कामांचेच प्रस्ताव तयार असून, त्यांना मान्यता देण्यात आली आहे. या कामांचे प्रस्ताव तयार करून त्यास मान्यता घेण्यास विभागप्रमुखांकडूनच टाळाटाळ केले जात असल्याचे चित्र आहे. आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर सुरुवातीला काही महिने याबाबत अतिरिक्त आयुक्तांकडून नियमित आढावा घेतला जात होता. मात्र, महापालिकेत एकच अतिरिक्त आयुक्त असल्याने अनेक विभागांचा भार त्यांच्यावरच असून, त्यांच्याकडूनही या बैठका नियमित होत नसल्याने विभागप्रमुखांचा मनमानी कारभार सुरू आहे. विकासकामांच्या निविदा काढण्यास, त्या मान्यतेसाठी ठेवण्यास आणि मंजूर झाल्यानंतर कार्यदेश देण्यास जाणीवपूर्क उशीर केला जात असल्याचे चित्र आहे.

> “ लोकसभा आणि विधानसभा सलग दोन निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे भांडवली विकासकामांचे प्रस्ताव रखडलेले आहेत. त्याबाबत सर्व विभागप्रमुखांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही कामे रखडल्याने अंदाजपत्रकातही मोठ्या प्रमाणात कामांपेक्षा वेतनावरच जास्त खर्च झाल्याचे चित्र आहे. मात्र, पुढील काही महिन्यांत भांडवली कामांची संख्या वाढलेली असेल.
>
> - डॉ. राजेंद्र भोसले, महापालिका आयुक्त.

# रेल्वे मार्गावर उभारला जाणार नवीन पूल

## चिंचवड स्टेशन येथील जुना पूल पाडणार : नवा पूल बांधण्यास महापालिका आयुक्तांची मान्यता




**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथे मुंबई-पुणे महामार्ग ते प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गादरम्यान असलेल्या लोहमार्गावर नवीन पूल उभारण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी झालेल्या स्थायी व सर्वसाधारण सभेत मंजुरी दिली आहे.

पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या स्थायी समितीची सभा झाली. या सभेमध्ये स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. या विषयांना प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली आहे. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

चिंचवड येथील रेल्वेवरील वाहतुकीसाठी दोन समांतर रेल्वे उड्डाणपूल अस्तित्वात आहेत. त्यापैकी चिंचवड स्टेशनवरुन चिंचवड गावाकडे जाताना उजव्या बाजुकडील पूल नवीन आहे. तसेच, डाव्या बाजुकडील पूल हा जुना आहे. जुन्या पुलाचे आयुर्मान संपत आले असल्याने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने या पुलाची पाहणी करण्यात आली होती. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट तज्ज्ञ संस्थेकडून करून घेण्यात आले होते. या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल महानगरपालिकेने आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरींग यांच्यामार्फत त्रयस्थपणे छाननी करून घेतला होता. त्यातच भारतीय रेल्वे विभागाने देखील पिंपरी चिंचवड महापालिकेला संबंधित पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी करणेबाबत पत्र पाठवले होते.

दरम्यानच्या काळात पुलाच्या केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटचे सादरीकरण महानगरपालिका आयुक्त यांच्यासमोर करण्यात आले. त्यानंतर आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार स्ट्रक्चरल ऑडिट अहवालाबाबत निष्कर्ष काढणे, आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेचे शहर अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीची बैठकीत स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल व रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार काही उपाययोजना सूचवल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी केला. तसेच जुन्या पुलाची स्थिती पाहता तो अवजड वाहतूक, बस यांच्यासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला. या पुलावरून केवळ हलक्या वाहनांची वाहतूक सुरू ठेवण्यात आली आहे.

### पाच ते दहा वर्ष वाढले पुलाचे आयुष्य

» पिंपरी येथील उड्डाणपुलाचे रेल्वेच्या सल्ल्यानुसार स्ट्रक्चरल ऑडिट करून मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. हे काम झाल्यामुळे पुलाचे आयुर्मान देखील ५ ते १० वर्षांनी वाढले आहे. आता या पुलाबाबत भविष्यात पाच वर्षांनंतर स्ट्रक्चरल ऑडिट करून रेल्वे विभागाच्या सल्ल्याने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी येथील पूल पाडण्याची सूचना किंवा लेखी पत्र रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेले नाही.

“ सल्लागारा मार्फत अंदाजपत्रक तयार करून रेल्वेच्या खात्याच्या मान्यतेनंतर निविदा कार्यवाही पुढील तीन महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात येईल. तसेच कामासाठी आवश्यक आर्थिक तरतुद करणेते येत आहे.

- प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग.

# 3 लाख 90 हजार 42 हजार 486 महिलांचे अर्ज बाद

## विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला पिंपरी-चिंचवड शहरातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. तब्बल 4 लाख 32 हजार 890 तरुणी व महिलांनी अर्ज भरले. त्यापैकी 3 लाख 89 हजार 920 महिला योजनेस पात्र ठरल्या आहेत. त्यांना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ मिळाला आहे. तर, 42 हजार 486 अर्ज बाद करण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. योजनेत पात्र ठरणाऱ्या महिलांना दरमहा 1 हजार 500 रुपये अर्थसाह्य केले जाते. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. अनेक महिलांना या योजनेचा लाभ मिळाल्याने विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरभरून मतदान केल्याचा दावा केला जात आहे. ही योजना महायुतीसाठी फायदेशीर ठरल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरातून या योजनेसाठी तब्बल 4 लाख 32 हजार 980 महिलांनी अर्ज भरले. महापालिकेचे केंद्र, नागरी सुविधा केंद्र, अंगणवाडी सेविका, ऑनलाईन अशा माध्यमातून महिलांनी अर्ज भरले. हे अर्ज 30 सप्टेंबर 2024 पर्यंत स्वीकारले गेले. त्यानंतर अर्ज स्वीकृती बंद करण्यात आली. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी 3 लाख 89 हजार 920 अर्ज वैध ठरले आहेत. त्यातील अनेकांना योजनेचा लाभही बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. तर, 42 हजार 486 अर्ज बाद करण्यात आले आहेत.

रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सर्वाधिक 65 हजार 871 महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. पांजरपोळ, भोसरी येथील ई क्षेत्रीय कार्यालयात 63 हजार 106 आणि थेरगाव येथील ग क्षेत्रीय कार्यालयात 60 हजार 33 महिलाचे अर्ज योग्य ठरले आहेत. तर, निगडी येथील फ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील सर्वाधिक 10 हजार 829 अर्ज बाद करण्यात आले आहेत. पाठोपाठ ड क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील 7 हजार 62 अर्ज बाद झाले आहेत.

आवश्यक कागदपत्रे नसणे, पिंपरी-चिंचवड शहराबाहेरील, मर्यादेपेक्षा उत्पन्न अधिक, एका कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांचे अर्ज, मुदतीमध्ये अर्ज प्राप्त न होणे आदी कारणे हे बाद करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### लाभ कधी मिळणार अशी विचारणा

» मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे सप्टेंबर 2024 पर्यंतचा लाभ अनेक लाडक्या बहिणींना मिळाला आहे. विधानसभा निवडणूक लागल्यानंतर लाभ देणे राज्य सरकारने बंद केले आहे. तसेच, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अर्ज भरलेल्या महिलांना लाभ मिळालेले नाही. लाभ कधी मिळणार, बँक खात्यात कधी रक्कम जमा होणार, अशी विचारणा महिला करीत आहेत.

# आरटीओ ताफ्यात चार नवीन वाहने

## पीएमआरडीए आयुक्तांनी बोलावली अभियंता विभागाची बैठक : विकासकामांना मिळणार गती

**पुणे | प्रतिनिधी**

बेबंद वाहनचालकांना चाप लावण्यासाठी अत्याधुनिक व स्वयंचलित आर्टिफिशिअल इंटेलिजन्स यंत्रणा बसविलेली 69 वेगवान वाहने राज्याच्या परिवहन विभागात दाखल झाली आहेत. त्यातील चार वाहने पुणे प्रादेशिक परिवहन विभागाला मिळाली आहेत. एमएच 12 च्या कार्यक्षेत्रात संचार करणाऱ्या या चार गाड्यांची पूजा येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नुकतीच करण्यात आली.



या गाड्यांवर लवकरच व्हेईकल टॉप माउंटेड रडारबेस सिस्टिम बसविण्यात येणार असून, ती बसवून झाल्यानंतर या चार गाड्या पुणे जिल्ह्यात वाहतुकीचा सर्वाधिक ताण असलेल्या तसेच नियमांचे सर्रास उल्लंघन होत असलेल्या ठिकाणी निगरानी ठेवून वाहतूक नियमनाचे काम करणार आहेत, अशी माहिती येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली.

अमेरिकेत प्रवास करताना वाहनचालक गाडीतील नेव्हिगेशन यंत्रणेद्वारे कॉपची गाडी कोठे आहे, याचा सतत मागोवा घेत असतात आणि ती जवळपास आल्याचे लक्षात येताच वाहनाच्या वेगमर्यादेसह वाहतुकीच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करत वाहन चालवितात, असा अनुभव आहे. अमेरिकन कॉपच्या या गाडीत वेगमर्यादा तपासणाऱ्या स्पीडगनसह अत्याधुनिक निगरानी यंत्रणा बसविलेली असल्याने वाहनचालकाने केलेल्या नियमभंगाची लागलीच नोंद केली जाते व संबंधित वाहनधारकाला क्षणार्धात त्याबाबतच्या दंडाचा भरणा करावा, असे तिकीट स्वयंचलित पद्धतीने पाठविले जाते.

त्यामुळे अमेरिकन वाहनचालक कॉपच्या या वाहनांना दबकून असतात.

> काही महिन्यांपूर्वीही पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या भरारी पथकाला दहा जीप मिळाल्या होत्या. त्यामध्येही स्पीडगनचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, त्यामध्ये स्वयंचलित पद्धतीने दंडाचे चलन पाठविण्याची सोय नाही. मात्र, या नव्या वाहनांमध्ये बसविलेल्या रडारबेस यंत्रणेद्वारे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकाची स्वयंचलित पद्धतीने छायाचित्रे घेतली जाणार असून, या यंत्रणेद्वारे त्याचे चलनही संबंधित वाहनधारकाला स्वयंचलित पद्धतीनेच पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक नियमभंगाचे प्रकार कमी होऊन वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होईल.
>
> **- स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.**

काहीशी अशाच प्रकारची रडारबेस यंत्रणा प्रादेशिक परिवहन विभागाला मिळालेल्या या नव्या वाहनांमध्ये बसविली जाणार आहे. त्यामुळे आरटीओच्या वायुवेग पथकातील या रडारबेस वाहनांचाही धाक निर्माण होईल व वाहनचालक नियमांचे पालन करू लागतील, असेही भोसले यांनी स्पष्ट केले.

प्रादेशिक परिवहन विभागाला मिळालेल्या या 69 वाहनांमध्ये अशी आर्टिफिशिअल इंटेलिजन्सयुक्त यंत्रणा बसविण्याचे टेंडरही परिवहन आयुक्तालयाकडून जारी केले असून, कंत्राटदारनिश्चितीचे कामही अंतिम टप्प्यात आहे. ही वाहने जिल्ह्यात कोणकोणत्या ठिकाणी पाठवायची, याची पाहणी सुरू असून, गर्दीच्या चौकात तसेच वाहतूक नियमांचे सर्वाधिक उल्लंघन होणाऱ्या ठिकाणांची माहिती त्यादृष्टीने घेण्यात येत आहे.

# आता जमीन मोजणी 6 नव्हे 3 महिन्यातच!

## महापालिका, नगरपालिका क्षेत्रांसाठी पैशांची बचत : 1 हेक्टर अर्थात 100 गुंठ्यांसाठी 3 हजार रुपये

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील जमीन मोजणीसाठी लागणारा वेळ सहा महिन्यांवरून तीन महिने करण्यात आला आहे. मात्र, मोजणीचा दर वाढविण्यात आला आहे. राज्यात आता नियमित आणि द्रुतगती, अशा दोन प्रकारांमध्ये जमीन मोजणी होणार असून, ग्रामीण भागातील साध्या मोजणीसाठी पूर्वीच्या दरांमध्ये दुपटीने वाढ करून आता नियमित मोजणी करताना दोन हेक्टरसाठी आता दोन हजार रुपये मोजावे लागणार आहेत, तर शहरी भागातील शेतजमिनींच्या मोजणीसाठी पूर्वी १० गुंठ्यांसाठी १ हजार द्यावे लागत होते. आता १ हेक्टर अर्थात १०० गुंठ्यांसाठी ३ हजार रुपये द्यावे लागतील.



### ग्रामीणसाठी दरांत दुप्पट वाढ

ग्रामीण भागात साध्या मोजणीसाठी पूर्वी २ हेक्टरसाठी १ हजार रुपये द्यावे लागत होते.

आता मात्र, २ हजार रुपये मोजावे लागणार आहेत, तर त्यापुढील प्रत्येक दोन हेक्टरसाठी आणखी १ हजार रुपये द्यावे लागणार आहेत.

तर द्रुतगती मोजणी करताना २ हेक्टरसाठी ८ हजार रुपये व त्यापुढील २ हेक्टरसाठी ४ हजार रुपये मोजावे लागतील.

### 14 वर्षांनंतर मोजणी दरात वाढ

**» पूर्वीच्या दरांच्या तुलनेत सात हजारांची बचत होणार आहे. तब्बल १४ वर्षांनंतर मोजणीचे दर वाढविले असले तरी मोजणीचा कालावधी कमी करण्यात आल्याचे स्पष्टीकरण भूमिअभिलेख विभागाने दिले आहे. हे नवीन दर १ डिसेंबरपासून लागू झाले आहेत.**

पूर्वी साधी, तातडीची, अतितातडीची आणि अति अतितातडीची अशी चार प्रकारांत जमीन मोजणी केली जात होती. त्यामुळे मनुष्यबळ चार ठिकाणी विभागले जात होते. परिणामी मोजणीसाठीचा कालावधी १८० दिवसांचा ठेवण्यात आला होता.

आता नियमित आणि द्रुतगती अशा दोन प्रकारांमध्ये जमीन मोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मनुष्यबळ दोन ठिकाणीच विभागले जाईल. त्यामुळे मोजणीची प्रक्रिया केवळ तीन महिन्यांच्या आत पूर्ण केली जाणार आहे. या कालमर्यादेमुळे अधिकाऱ्यांवरही मोजणीचे बंधन राहील. मोजणी वेळेत न झाल्यास संबंधितांवर सेवा हक्क कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.